# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे अधिवेशन, २०२५

---

### तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**शुक्रवार, दिनांक १८ जुलै, २०२५ / आषाढ २७, १९४७ (शके)**

| | |
|---|---|
| **(१) जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री**<br>**(२) उच्च व तंत्र शिक्षण, संसदीय कार्ये मंत्री**<br>**(३) जलसंपदा (विदर्भ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ), आपत्ती व्यवस्थापन मंत्री**<br>**(४) शालेय शिक्षण मंत्री**<br>**(५) कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री**<br>**(६) पणन, राजशिष्टाचार मंत्री**<br>**(७) क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्यांक विकास व औकाफ मंत्री**<br>**(८) वस्त्रोद्योग मंत्री**<br>**(९) सहकार मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - १६**

---

### मुंबई विद्यापीठाच्या मादाम कामा महिला वसतिगृहात मूलभूत सुविधांचा अभाव असल्याबाबत

**(१) * ३१२४ श्री.मिलिंद नार्वेकर, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.कृपाल तुमाने, श्री.राजहंस सिंह, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाच्या नरिमन पॉइंट येथील १२६ विद्यार्थिनींचे वास्तव्य असलेल्या मादाम कामा मुलींच्या वसतिगृहात अनेक मूलभूत सुविधांचा अभाव असल्याचे दिनांक १२ एप्रिल, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, १२६ विद्यार्थिनींचे वास्तव्य असलेल्या वसतिगृहात गेले १५ दिवस खानावळ बंद असल्याने विद्यार्थिनींच्या जेवणाची गैरसोय होत असून वसतिगृहात पूर्णवेळ वॉर्डन नसल्याने मुलींच्या सुरक्षिततेकडे प्रशासनाचे अक्षम्य दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू वसतिगृहातील मूलभूत सुविधांमुळे विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या गैरसोयीबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी कुलगुरू, मुंबई विद्यापीठ यांना लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मुंबई विद्यापीठाच्या नरिमन पॉइंट येथील मादाम कामा वसतिगृहात मूलभूत सुविधा पुरविण्याबाबत व पूर्णवेळ वॉर्डनचे पद भरण्याबाबत तसेच सन २०२५-२६ हे नवीन शैक्षणिक वर्ष सुरु होत असून, मूलभूत

सुविधांच्या अभावामुळे विद्यार्थिनींची गैरसोय होऊ नये यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच वसतिगृहात मूलभूत सुविधा न पुरविणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील :** (१) व (२) हे खरे नाही.

मुंबई विद्यापीठाच्या मादाम कामा वसतिगृहातील मेस काही अपरिहार्य कारणामुळे १० दिवस बंद होती, जेव्हा मेस बंद असते तेव्हा विद्यार्थीनींना याची पूर्वसूचना दिली जाते. आता, मेस नियमित सुरु आहे. सदर वसतिगृहामध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून दिवसाला अंदाजे २५,००० लिटर पुरेशा पाण्याचा पुरवठा करण्यात येतो. वसतिगृहात पाण्याचे ४ कुलर्स व ३२ गिझर्सची व्यवस्था आहे. वसतिगृहातील सर्व लाईट्स चालू स्थितीत आहेत. वसतिगृहामध्ये सर्व मूलभूत सोयी सुविधा उपलब्ध असून याबाबत वसतिगृहातील विद्यार्थीनींची कोणतीही तक्रार नाही.
(३) हे खरे नाही.
(४) विद्यापीठाच्या वसतिगृहात पूर्ण वेळ वसतिगृह अधीक्षिका, प्रत्येक शिफ्ट मध्ये दोन महिला सुरक्षारक्षक व कर्मचारी उपलब्ध आहेत. वसतिगृहातील सर्व विद्यार्थीनींसाठी चांगल्या सोयी-सुविधा विद्यापीठाकडून उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. वसतिगृहातील विद्यार्थीनींची कोणतीही गैरसोय होत नाही. तशी वसतिगृहातील विद्यार्थीनींची कोणतीही तक्रार नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयात कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याबाबत

**(२) * ३३२३ श्री.दादाराव केचे :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयात झालेल्या १०० कोटी रुपयांच्या गैरव्यवहाराबाबत दिनांक ५ ऑगस्ट, २०१९ रोजी नेमण्यात आलेल्या समितीचा अहवाल प्राप्त झाला असून अहवालात केलेल्या शिफारशींच्या अनुषंगाने दोषींवर कारवाई करण्यासाठी मा.लोकायुक्त यांनी दिनांक ६ जुलै, २०२४ रोजी आदेश दिलेले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर समितीच्या अहवालाच्या अनुषंगाने तसेच मा.लोकायुक्तांच्या आदेशानुसार व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयात झालेल्या १०० कोटी रुपयांच्या गैरव्यवहारातील संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मंगलप्रभात लोढा :** (१) होय, हे खरे आहे.
(२) चौकशी समितीने सादर केलेल्या अहवालानुसार पुढील कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## छत्रपती संभाजीनगर कृषी उत्पन्न बाजार समितीने जमीन खरेदीमध्ये गैरव्यवहार केल्याबाबत

**(३) * २३६१ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) छत्रपती संभाजीनगर कृषी उत्पन्न बाजार समितीने लाडसावंगी उपबाजारपेठ विकसित करण्यासाठी माहे डिसेंबर, २०२४ मध्ये गट नं. ६१० व ६०३ मधील १३ एकर जमीन खरेदी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लाडसावंगी परिसरात जमिनीचे शासकीय दर प्रति एकर रुपये ८.६८ लाख असून, बाजारभाव अंदाजे रुपये १२.०० लाख एवढा आहे, जमिनीचे व्यवहार होण्यापूर्वी खाजगी ठेकेदाराने माहे ऑक्टोबर, २०२४ मध्ये १३ एकर जमीन रुपये ३ कोटी ९१ लाखांमध्ये खरेदी केली असून तीच जमीन माहे नोव्हेंबर-डिसेंबर, २०२४ मध्ये कृषी उत्पन्न बाजार समितीने रुपये ४ कोटी ७५ लाख एवढ्या रकमेस ठेकेदाराकडून खरेदी केल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर जमिनीचा व्यवहार करु नये म्हणून कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालक मंडळाच्या बैठकीत काही संचालकांनी विरोध दर्शविला होता, परंतु त्यांचे मत विचारात न घेता कृषी उत्पन्न बाजार समितीने सदर जमीन प्रति एकर रुपये ३६.५० लाख याप्रमाणे खरेदी करुन आर्थिक गैरव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त जमीन व्यवहाराची गुन्हे शाखेमार्फत चौकशी करुन गैरव्यवहार करणाऱ्या कृषी उत्पन्न बाजार समितीमधील संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार रावल :** (१) हे खरे आहे.

महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी विक्री (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ मधील कलम १२(१) अन्वये पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या मान्यतेने संबंधित जमीन खरेदी केली आहे.

(२) हे खरे नाही.

छत्रपती संभाजीनगर कृषी उत्पन्न बाजार समितीने जमीन खरेदीबाबत वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागवून न्यूनतम प्राप्त निविदेनुसार जमीन खरेदी केलेली आहे. खाजगी ठेकेदाराने केलेला व्यवहार बाजार समितीशी संबंधित नाही.

(३) बाजार समितीच्या तीन संचालकांनी ठराव कायम करण्याच्या सभेत विरोध केला होता.संबंधित ठराव हा बहुमताने पारित करण्यात आलेला आहे. पारित ठरावानुसार जमीन खरेदी करण्यात आलेली आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भंडारा जिल्हा परिषदेच्या जकातदार माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विद्यालयातील विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांना परीक्षेपासून वंचित ठेवल्याबाबत

**(४) * ३४६३ डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रसाद लाड, श्री.सदाशिव खोत, श्री.वसंत खंडेलवाल, श्रीमती उमा खापरे, श्रीमती चित्रा वाघ, श्री.संजय केणेकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्हा परिषदेच्या जकातदार माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विद्यालयात अकरावी विज्ञान शाखेच्या ३६ विद्यार्थ्यांना अंतिम परीक्षेपासून वंचित ठेवण्यात आले असल्याचे माहे एप्रिल, २०२५ च्या मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विद्यार्थ्यांनी शाळा शुल्क न भरल्याच्या कारणावरून त्यांना विज्ञान शाखेच्या मराठी विषयाच्या पहिल्या पेपरला बसू न देता परत पाठविण्यात आल्याचे त्याचसुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर ३६ विद्यार्थ्यांमध्ये मुलींची संख्या अधिक असून मुलींना मोफत शिक्षण देण्यात येत असतानाही शाळा शुल्क बाकी असल्याच्या कारणावरून परीक्षेपासून वंचित ठेवणाऱ्या संबंधित मुख्याध्यापक यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) अंशतः खरे आहे, सदर विद्यालयातील इयत्ता ११वी ची विज्ञान शाखेची तुकडी स्वंय अर्थ सहाय्यीत असून सदर तुकडी मध्ये ६३ विद्यार्थी शिकत आहेत. त्यापैकी ३६ विद्यार्थ्यांनी शैक्षणिक शुल्क न भरल्यामुळे त्यांची मराठी विषयाची दिनांक ८ एप्रिल, २०२५ रोजी परीक्षा घेण्यात आली नाही. तथापि, सदर विद्यार्थ्यांची परीक्षा दिनांक २३ एप्रिल, २०२५ रोजी घेण्यात आली आहे.

(३) सदर ३६ विद्यार्थ्यांमध्ये २१ मुले व १५ मुलींचा समावेश आहे. सदर प्रकरणी शाळेच्या मुख्यध्यापकांना सक्त ताकीत देण्यात आली आहे. शासन निर्णय दिनांक १२/०८/२०२१ मधील तरतुदींचे काटेकोर पालन करण्याचा सुचना देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## हिमायतनगर (जि.नांदेड) तालुक्यात जिल्हा परिषदेच्या २० शाळांमध्ये प्रत्येकी केवळ एकच शिक्षक असल्याबाबत

**(५) * ३९२६ श्री.हेमंत पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिमायतनगर (जि.नांदेड) तालुक्यात जिल्हा परिषदेच्या एकूण ११० शाळा असून त्यापैकी १४ शाळांवर एकही शिक्षक नाही तसेच २० शाळांमध्ये प्रत्येकी केवळ एकच शिक्षक असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर २० जिल्हा परिषद शाळांची पटसंख्या १०० ते १२३ पर्यंत असतानाही सदर शाळांवर केवळ एकच शिक्षक असल्यामुळे त्यांना अनेक वर्गांना एकाच वेळी शिकविणे शक्य होत नसल्याने

विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, हिमायतनगर तालुक्यातील जिल्हा परिषद शाळेत एकूण ४५६ शिक्षकांची पदे असून त्यापैकी १९९ पदे गत काही महिन्यांपासून रिक्त असल्याने उर्वरीत शिक्षकांवर कामाचा अतिरिक्त ताण येत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये याकरीता रिक्त असलेली १९९ पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) हे खरे आहे.
(२) शुन्य शिक्षक व एक शिक्षक असलेल्या शाळांमध्ये पटसंख्या ६० पेक्षा कमी आहे. या शाळांमध्ये विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून इतर शाळांतील शिक्षकांची अध्यापनाकरीता तात्पुरती व्यवस्था केली आहे.
(३) व (४) सन २०२४-२५ च्या संचमान्यतेनुसार हिमायतनगर तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षकांच्या मंजूर असलेल्या ३९७ पदांपैकी ९५ पदे रिक्त आहेत. मा.उच्च न्यायालयाने सद्य:स्थितीत समायोजनाच्या प्रक्रियेत स्थगिती दिली असल्याने रिक्त पदांवर अतिरिक्त शिक्षकांची नियुक्ती करता येत नाही. तथापि, प्राथमिक शिक्षकांच्या बदल्यांचे पोर्टल सुरु झाले असल्याने जिल्हांतर्गत बदलीतून बहुतांशी रिक्त पदे भरली जाणार आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कृष्णा कालव्याच्या पाण्याची गळती थांबवून वहनक्षमता वाढविण्याबाबत

**(६) * ४२२६ श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) साताऱ्यासह सांगली जिल्ह्यातील हजारो हेक्टर शेती क्षेत्राकरीता पाणीपुरवठा करणाऱ्या कृष्णा कालव्यात सध्या पाण्याचे आवर्तन सुरु असून, कराडजवळ कालव्याची देखभाल आणि दुरुस्ती न झाल्यामुळे जलपर्णीचा प्रादुर्भाव, कालव्याची पडझड, झुडपे आणि गाळ साचणे यामुळे कालव्याची वहनक्षमता कमी होऊन शेतीपर्यंत पाणी पोहोचण्यास अडचणी येत असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सैदापूर येथे नागरी वस्त्यांमधील सांडपाणी थेट कृष्णा कालव्यात सोडण्यात येत असल्यामुळे कालव्याचे पाणी दूषित झाले असून त्याला दुर्गंधी येत आहे. हे पाणी शेतीसाठी आणि इतर वापरासाठी अयोग्य ठरत आहे. हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कालव्याच्या पडझड झालेल्या भागांची दुरुस्ती आणि अस्तरीकरणाची (lining) कामे करून पाण्याची गळती थांबावी आणि वहनक्षमता वाढावी यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत आणि सैदापूरसारख्या ठिकाणी नागरी वस्त्यांमधून कालव्यात सोडले जाणारे सांडपाणी थांबवण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही / उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) अंशत: खरे आहे,

कृष्णा कालवा हा ब्रिटीशकालीन असून काळया मातीतून प्रवाहित होतो. त्यामुळे तिथे सातत्याने झाडे-झुडपे वाढतात. परंतु ते काढून आवश्यकतेनुसार दुरूस्ती करून पाणी आवर्तन दिले जाते.

(२) अंशत: खरे आहे.

कृष्णा कालव्याच्या एकूण ८६ कि.मी. लांबीतील ८०% भाग हा काळया मातीतून जात आहे. सैदापूर येथील नागरी वस्त्यांमधील सांडपाणी रोखणे कामी आवश्यक उपाययोजना करणेबाबत संबंधित ग्रामपंचायतीस वेळोवेळी कळविण्यात आलेले आहे. तसेच त्याठिकाणी सा.क्र.०/४०० मी. ते २/६०० मी. मध्ये गॅबीयन भिंतीचे काम प्रगतीपथावर आहे.

(३) कालव्याची पडझड झालेल्या भागांची दुरूस्तीची आणि अस्तरीकरणाची विशेष दुरुस्ती कामे कृष्णा कालवा सा.क्र.०/४०० मी. ते २/६०० मी., सा.क्र.४८/६१० मी. ते ६४/५०० मी., सा.क्र.७७/२९० मी. ते ७७/७१० मी. व सा.क्र.८०/०१० मी. ते ८०/५५० मी. दरम्यान प्रगतीपथावर आहेत.

कृष्णा कालव्यातील पाण्याची गळती थांबवून वहनक्षमता पुनर्स्थापित करण्याकरीता कालव्याच्या एकूण ८६ कि.मी. लांबीपैकी आवश्यक ठिकाणी अस्तरीकरण करणे, विमोचकाची दुरूस्ती करणे या कामांचा समावेश करून अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून प्रशासकीय मान्यता घेण्याच्या दृष्टीने आवश्यक कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर प्रगतीत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात उच्च माध्यमिक व कला क्रीडा शिक्षकांचे वरिष्ठ व निवडश्रेणी तालुकास्तरीय प्रशिक्षण एकाच वेळी आयोजित केल्याबाबत

**(७) * ४४४५ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत, श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, रहाटोली, जि.ठाणे यांचेतर्फे उच्च माध्यमिक व कला क्रीडा शिक्षकांचे वरिष्ठ व निवडश्रेणी तालुकास्तरीय प्रशिक्षण दिनांक २ जून, २०२५ पासून ते १२ जून, २०२५ पर्यंत संपूर्ण महाराष्ट्रात एकाच ठिकाणी आयोजित करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तांत्रिक अडचणी आणि नियोजनातील त्रुटींमुळे अनेक शिक्षक प्रशिक्षणापासून वंचित राहिले असून प्रशिक्षणादरम्यान सर्व्हरवरील ताण किंवा सॉफ्टवेअरमधील त्रुटींमुळे टेस्ट लिंक ओपन न होणे, तसेच अनेक शिक्षक प्रशिक्षणास पहिल्या दिवसापासून वेळेवर उपस्थित असून पहिल्या हजेरी पत्रक यादीत त्यांचे नाव आले होते परंतु नंतरच्या याद्यांमध्ये त्यांची नावे येत नसल्याने यादीवर कॉलम बनवून सह्या घेण्यात आल्या तसेच प्रशिक्षणाचा कालावधीदेखील जास्त ठेवण्यात आलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, व्हायरल इन्फेक्शनमुळे अचानक आजारी पडलेल्या शिक्षकांना अडचण येऊ नये यासाठी १००% उपस्थितीबाबतच्या नियमात शिथिलता द्यावी अशी शिक्षकांची मागणी आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, प्रशिक्षणात सहभागी होणाऱ्या सर्व शिक्षकांना त्यांच्या अभ्यासक्रमाशी संबंधित आवश्यक अभ्यास साहित्य न मिळणे तसेच सदर प्रशिक्षणासाठी दोन हजार रुपये मूल्य आकारले असून आवश्यक मूलभूत सुविधा, सुयोग्य बैठक व्यवस्था, भोजन, चहा याचे कोणतेही नियोजन केलेले नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने या प्रशिक्षणार्थींनी केलेल्या विविध मागण्यां व त्यांच्या विविध समस्या सोडविण्याबाबत तसेच सदर प्रशिक्षणापासून वंचित असणाऱ्या शिक्षकांकरीता प्रशिक्षणाचा दुसरा टप्पा राबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) हे अंशतः खरे आहे,

प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व अध्यापक विद्यालयामधील नावनोंदणी केलेले शिक्षक तसेच कला व क्रीडा शिक्षक यांचेकरीता वरिष्ठ व निवड वेतनश्रेणी प्रशिक्षण राज्यात दिनांक ०२ ते १२ जून २०२५ या कालावधीत आयोजित करण्यात आले होते. कला व क्रीडा शिक्षकांची संख्या अत्यल्प असल्याने, त्यांचेसाठी सदर प्रशिक्षण ७ दिवस संबंधित जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था स्तरावर व ३ दिवस विभागीय जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था स्तरावर करण्यात आले होते तसेच अध्यापक विद्यालयातील शिक्षकांसाठी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, पुणे येथे आयोजित करण्यात आले होते. शिक्षकांना सोयीचे होईल अशा पध्दतीने दोन तीन तालुके एकत्रित करून प्रशिक्षण केंद्र निश्चित करण्याची जबाबदारी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थांवर सोपविण्यात आली होती.

(२) हे अंशतः खरे आहे,

प्रशिक्षणार्थी शिक्षकांना आलेल्या तांत्रिक अडचणींबाबत संबंधित जिल्ह्याच्या जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थांच्या प्राचार्यांनी शहनिशा करून अहवाल राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांचेकडे सादर केला असून, त्याबाबत कार्यवाही सुरु आहे. शासन निर्णय दिनांक २०/०७/२०२१ नूसार सदर प्रशिक्षण किमान ५० तासांचे घेण्याबाबत तरतूद असल्याने, प्रशिक्षणाचा कालावधी १० दिवसांचा ठेवण्यात आला होता.

(३) होय.

(४) हे अंशतः खरे आहे.

सदर प्रशिक्षण सशुल्क असून शासन मान्यतेनूसार प्रति प्रशिक्षणार्थी रुपये २०००/- शुल्क आकारण्यात आलेले आहे. त्यामध्ये वाचन साहित्य, साहित्य विकसन कार्यशाळेतील अनुभवी व तज्ञांचा प्रवास/निवास खर्च व इतर अनुषंगिक खर्चाचा समावेश होतो. सदर शुल्कामध्ये प्रशिक्षणार्थ्यांच्या भोजन/चहापानाचा समावेश नाही. प्रशिक्षणाच्या ठिकाणी आवश्यक भौतिक सुविधा सुसज्ज इमारत, वर्गखोल्या, महिला प्रशिक्षणार्थी व पुरुष प्रशिक्षणार्थी शिक्षकांसाठी स्वतंत्र स्वच्छता गृहाची व्यवस्था,

स्वच्छतागृहात पाणी उपलब्ध असणे, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था इत्यादी मूलभूत सोयीसुविधा वरिष्ठ व निवड श्रेणी प्रशिक्षणादरम्यान देण्यात आलेल्या आहेत.

(५) तालुकास्तरीय दैनंदिन प्रशिक्षणाचे संनियंत्रण राज्य शैक्षणिक संशोधन व परिषदेकडून करण्यात आले असून, प्रशिक्षण केंद्र समन्वयक आणि प्राचार्य जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांना प्रशिक्षणाचे नियोजन, प्रत्यक्ष अंमलबजावणी करताना येणाऱ्या अडचणी ताबडतोब सोडविल्या गेल्या आहेत. दिनांक ०२ ते १२ जून, २०२५ या कालावधीत पार पडलेल्या प्रशिक्षणार्थी शिक्षकांना नेहमीप्रमाणे प्रशिक्षणोत्तर मूल्यमापनासाठी करावयाचे प्रकल्प/नवोपक्रम/कृती संशोधन व स्वाध्याय यासाठी प्रशिक्षणानंतर ४० दिवसांचा कालावधी देण्यात आला असून, सदर प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर प्रशिक्षणाचा पुढील टप्पा आयोजित करण्यात येईल.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सीबीएसई अभ्यासक्रमात छत्रपती शिवाजी महाराज यांच्यावरील इतिहासाचे लेखन अपुरे असल्याबाबत

**(८) * ४४७४ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सीबीएसईच्या पहिली ते बारावीपर्यंतच्या संपूर्ण अभ्यासक्रमात छत्रपती शिवाजी महाराज यांच्यावर केवळ एकच धडा असून त्यामध्ये फक्त ६८ शब्दांमध्ये त्यांचे कार्य, नेतृत्व आणि इतिहास मांडण्यात आला असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सीबीएसई अभ्यासक्रम तयार करणाऱ्या समितीने देशाच्या इतिहासात स्वतंत्र हिंदवी स्वराज्य स्थापणारे, धाडसी, दूरदृष्टीचे, शिस्तप्रिय व धर्मनिरपेक्ष धोरणाचे प्रतिक असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्यावरील इतका अल्प उल्लेख हा त्यांच्या ऐतिहासिक कारकिर्दीकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मराठी विद्यार्थ्यांप्रमाणेच संपूर्ण देशातील विद्यार्थ्यांनाही शिवचरित्रातून प्रेरणा मिळावी, याकरीता सीबीएसई अभ्यासक्रमात छत्रपती शिवाजी महाराज यांच्यावरील इतिहास अधिक सविस्तर, अभ्यासपूर्ण आणि वास्तवदर्शी व्हावा, यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठपुरावा केला आहे, हे ही खरे काय,

(४) असल्यास, शासनाने केंद्रीय शिक्षण मंत्रालयाकडे लेखी निवेदन दिले असून निवेदनाच्या अनुषंगाने केंद्र शासनाने कोणती सकारात्मक भूमिका घेतली आहे, शिवचरित्राच्या सादरीकरणात गंभीर अपूर्णता आढळून आल्या प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) हे खरे आहे.

(२) होय.

(३) व (४) मा.केंद्रीय शिक्षा मंत्री व महाराष्ट्र राज्याचे मा.शालेय शिक्षण मंत्री यांच्यामध्ये झालेल्या चर्चेनुसार, छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास CBSE बोर्डाच्या इयत्ता ७ वी ते १० वी च्या अभ्यासक्रमात घेण्याबाबत आश्वासन देण्यात आले आहे. त्यानुसार राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण

परिषद (SCERT), महाराष्ट्र, पुणे यांच्यामार्फत छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास समाविष्ट करण्याबाबतची माहिती राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (NCERT), नवी दिल्ली यांना पुरविण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## लातूर जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागातील शिक्षणाधिकारी (प्राथमिक व माध्यमिक) यांनी खाजगी शिक्षण संस्थांच्या संगनमताने केलेल्या गैरव्यवहाराबाबत

**(९)** * **४४८९ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लातूर जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागातील शिक्षणाधिकारी (प्राथमिक व माध्यमिक) यांनी खाजगी शिक्षण संस्थांच्या संगनमताने मागील दिनांकाने नियुक्त्या देणे, चुकीची संच मान्यता प्रदान करणे, तसेच थकीत वेतन अदा करण्याच्या स्वरूपात अनियमितता केली असल्याची बाब माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निर्णयांमुळे शासनाची आर्थिक फसवणूक झाली असून, तद्‌नुषंगाने अनेक नागरिकांनी व सामाजिक संस्थांनी तक्रारी करुनही त्यांचे वरिष्ठ अधिकाऱ्यांशी आर्थिक हितसंबंध असल्यामुळे त्यांचेवर कारवाई करण्यास जाणिवपुर्वक दुर्लक्ष करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्‌नुषंगाने मागील दिनांकाचे खोटे आदेश, बोगस कर्मचारी नियुक्त्या व चुकीच्या मान्यता तसेच वेतन अदा यासंबंधी शिक्षण संस्थांच्या संमतीने झालेल्या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यासाठी स्वतंत्र उच्चस्तरीय समिती स्थापन करुन दोषींवर कारवाई करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) शिक्षणाधिकारी (प्राथ.) व शिक्षणाधिकारी (माध्य.), जि.प.लातुर यांचेविरुध्द शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी यांच्या वैयक्तिक मान्यता, वेतन व समायोजन यासंदर्भात अनेक तक्रारी प्राप्त आहेत.
(२) हे खरे नाही.

सदर तक्रारीच्या अनुषंगाने नियमानुसार कार्यवाही करुन शासनास अहवाल सादर करण्याबाबत आयुक्त (शिक्षण), पुणे यांना कळविण्यात आले आहे.
(३) तक्रारदार श्री.उमेश अंबादास कांबळे यांनी दिनांक ११/०६/२०२५ अन्वये केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने शिक्षणाधिकारी (माध्य.), जि.प.लातुर यांचेविरुध्द प्राथमिक चौकशीची कार्यवाही सुरू असून, त्यानुषंगाने विद्यमान शिक्षणाधिकारी यांचा कांही मुद्यांसंबंधी अंतरिम अहवाल प्राप्त झाला आहे.

तर, उर्वरित मुद्यांबाबत विभागीय शिक्षण उपसंचालक, लातुर यांना चौकशी करून अहवाल सादर करण्याबाबत शिक्षण आयुक्तालयाकडुन कळविण्यात आले आहे. त्यानुसार शिक्षणाधिकारी (प्राथ.), जि.प.लातुर यांच्याविरुध्द प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक १०/०७/२०२५ रोजी विभागीय शिक्षण उपसंचालक, लातुर यांचेकडे सुनावणी आयोजित करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईत गत सहा वर्षांमध्ये मराठी माध्यमाच्या ४० शाळा बंद झाल्याबाबत

**(१०)** * **४५६२ श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत गत सहा वर्षांमध्ये मराठी माध्यमाच्या ४० शाळा बंद झाल्याने ५० हजारांहून अधिक विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याने त्यांनी मराठीऐवजी इतर माध्यमांच्या (उदा. इंग्रजी, हिंदी, गुजराती) आणि इतर बोर्डाच्या (उदा. सीबीएसई, आयसीएसई) शाळेत प्रवेश घेतला असून, सदर बंद पडलेल्या शाळांपैकी सर्वाधिक २० मराठी शाळा ह्या दक्षिण मुंबईतील असल्याचे दिनांक १२ जून, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे, चौकशीच्या अनुषंगाने मुंबईतील मराठी शाळा वाचविण्यासाठी व विद्यार्थ्यांचे होणारे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही / उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) अंशतः खरे आहे.

मुंबई विभागामध्ये दिवसेंदिवस पालकांचा कल इंग्रजी माध्यमांच्या शाळांकडे वाढत असून मराठी माध्यमांच्या शाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या कमी होत आहे. पटसंख्या कमी (शून्य) झाल्याने मुंबईत मागील ६ वर्षांमध्ये मराठी माध्यमाच्या ३९ शाळा बंद झाल्याचे आढळून आले आहे. त्यापैकी दक्षिण मुंबईतील १४ शाळा बंद झाल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) व (३) शासन निर्णय दिनांक १९/०६/२०१३ अन्वये मराठी माध्यमांच्या शाळांमधील विद्यार्थ्यांची घसरण थांबविण्यासाठी शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून सेमी इंग्रजीचे वर्ग सुरु करण्यास परवानगी देण्यात आलेली आहे.

समग्र शिक्षा अंतर्गत प्रधानमंत्री शक्ती पोषण निर्माण आहार योजना, विद्यार्थीसाठी मोफत पुस्तके व गणवेश, शाळांना संगणक, आयसीटी लॅब, क्रीडा साहित्य विज्ञान प्रयोगशाळा, डिजिटल लॅब, रोबोटिक कोडिंग लॅब व इतर सुविधा पुरविण्यात येतात. तसेच, आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख होण्यासाठी शाळेला डिजिटल क्लासरूम उपलब्ध करून दिलेली आहे.

मुलींच्या शिक्षणाचा खर्च भागावा यासाठी मुलींना सावित्रीबाई दत्तक पालक योजनेतंर्गत आर्थिक मदत, अपंग मुलांना शाळेत उपस्थित राहणेसाठी वाहतूक भत्ता, हुशार असलेल्या गरीब विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, शासकीय तसेच अनुदानित शाळांना वेतना व्यतिरिक्त खर्चासाठी वेतनेत्तर अनुदान, मराठी माध्यमाच्या विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी वाढीस लागावी यासाठी अवांतर वाचनाची पुस्तके उपलब्ध करून देणे, शिक्षकांसाठी विविध प्रशिक्षण कार्यक्रम राबवून शिक्षणाची गुणवत्ता वाढविणे, अशा विविध उपक्रमांच्या माध्यमातून मराठी माध्यमाच्या शाळांमधील विद्यार्थी पटसंख्या वाढविणेसाठी व मराठी माध्यमांच्या शाळा टिकवून ठेवणेसाठी प्रयत्न केले जात आहेत.

----------------

## नागपूर जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये शिक्षकांची ५६५ पदे रिक्त असल्याबाबत

**(११) * ४५७१ श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये ४ हजार ४१४ शिक्षकांची मंजूर पदे असताना सद्य:स्थितीत ५६५ शिक्षकांची पदे रिक्त असल्याचे माहे जून, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रिक्त पदांमुळे येथील अनेक शाळा एक शिक्षकी झाल्या असल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असून त्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणापासून वंचित रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) नागपूर जिल्हा परिषदेच्या प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांमध्ये शिक्षकांची ४११४ पदे मंजूर असून त्यापैकी ५६५ पदे सद्य:स्थितीत रिक्त आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) नागपूर जिल्हा परिषदेअंतर्गत १३ टक्के इतकी शिक्षकीय पदे रिक्त असून पदभरतीच्या विहीत मर्यादेत रिक्त पदे पवित्र पोर्टलमार्फत भरण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत कार्यरत स्वयंपाकी तथा मदतनीस यांच्या मानधनात वाढ करण्याबाबत

**(१२) * ३९२९ श्री.हेमंत पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत गेल्या २० ते २५ वर्षांपासून कार्यरत असलेले सुमारे १ लाख ७५ हजार स्वयंपाकी तथा मदतनीस हे पोषण आहार तयार करणे, शाळा उघडणे, शाळेची देखभाल करणे, स्वच्छता राखणे, जेवणानंतर विद्यार्थ्यांची ताटे धुणे, शौचालयाची साफसफाई करणे इत्यादी जबाबदारी पार पाडीत असूनही सदर कर्मचाऱ्यांना दरमहा २५००/- रुपये एवढे तुटपुंजे मानधन देण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजनेंतर्गत कार्यरत असणाऱ्या पाँडीचेरी राज्यातील कर्मचाऱ्यांना रुपये १४,०००/-, केरळमध्ये रुपये १०,०००/- तसेच तामिळनाडूमध्ये रुपये ७८००/- इतके दरमहा मानधन देण्यात येत असून, त्याच धर्तीवर महाराष्ट्र राज्यातील स्वयंपाकी व मदतनीसांच्या मानधनात वाढ करण्याबाबतची मागणी उक्त कर्मचाऱ्यांकडून वारंवार करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त योजनेंतर्गत कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या मानधनात वाढ करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी लेखी निवेदनाद्वारे मा.शालेय शिक्षण मंत्री यांचेकडे दिनांक २४ एप्रिल, २०२५ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, लोकप्रतिनिधींनी मा.शालेय शिक्षण मंत्री यांच्याकडे दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने केलेल्या मागणीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) अंशत: खरे आहे.

प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत १,६४,५५८ स्वयंपाकी तथा मदतनीस कार्यरत आहेत. सदर स्वयंपाकी तथा मदतनीस यांना वर्षातील १० महिन्यांकरीता रुपये २५००/- प्रति माह मानधन देण्यात येते. सदर मानधनामध्ये केंद्र हिस्सा रुपये ६००/- व समप्रमाण राज्य हिस्सा रुपये ४००/- आहे. तथापि, राज्य हिस्स्यातून अतिरिक्त रुपये १५००/- मानधन देण्यात येत आहे.
(२) अंशत: खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) योजनेंतर्गत कार्यरत असणाऱ्या स्वयंपाकी तथा मदतनीस यांच्या मानधनातील केंद्र हिस्सा वाढविण्याची विनंती केंद्र शासनास केली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाशिक जिल्ह्यातील ४८ गावांना भूस्खलनाचा धोका निर्माण झाल्याबाबत

**(१३)** * ४४७९ **श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **आपत्ती व्यवस्थापन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्ह्यातील ४८ गावांना भूस्खलनाचा धोका असून, त्यापैकी सायखेडा, निफाड, चांदोरी ही गावे अतिसंवेदनशील असल्याने भूस्खलनाच्या धोक्यामुळे या गावांमध्ये राहणाऱ्या नागरिकांच्या जीविताला धोका निर्माण झाला असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दरडप्रवण क्षेत्रातील नाले, रस्ते, विहिरी, कालवे, बंधारे या जलस्रोतांची स्वच्छता व दुरुस्तीअभावी पूर नियंत्रण कक्षाची स्थापना करण्यात आली आहे, तसेच चार ठिकाणे जिऑलॉजिकल कोड असलेली अतिसंवेदनशील म्हणून घोषित केली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नाशिक जिल्ह्यातील या ४८ गावांवरील भूस्खलनाच्या धोक्याच्या कारणांची शासनाने चौकशी केली आहे काय व नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आणि भूस्खलनावर नियंत्रण मिळवण्यासाठी कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) नाही, हे खरे नाही. Geological Survey of India यांच्या List of Landslide Susceptible villages in Maharashtra (भुस्खलन संवेदनशील गावांची यादी) मध्ये नाशिक जिल्ह्यातील सायखेडा, निफाड, चांदोरी या गावांचा समावेश नाही.
(२) नाशिक पाटबंधारे विभाग, नाशिक यांचेमार्फत मान्सून कालावधीत पूर नियंत्रणासाठी दिनांक ०१ जून ते १५ ऑक्टोबर अथवा पाऊस सुरु असेपर्यंत पूर नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात येत असतो. निफाड तालुक्यातील गावे अतिसंवेदनशील म्हणून घोषित केलेली नाहीत.

(३) नाशिक जिल्ह्यामध्ये व निफाड तालुक्यातील गावांमध्ये भुस्खलनाची घटना अद्यापपावेतो घडलेली नाही. केवळ इगतपूरी तालुक्यातील ८ गावे Geological Survey of India च्या यादीनूसार दरडप्रवण क्षेत्रात येतात. परंतु संभाव्य दरडप्रवण क्षेत्रामध्ये प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याच्या सूचना आपत्ती व्यवस्थापन विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक यांनी सर्व विभागांना दिल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**जायकवाडी धरण परिसरातील १८४ हेक्टर जमिनीचे कायमस्वरूपी संपादन करण्याबाबत**

**(१४) * ४५३८ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जायकवाडी धरण परिसरातील १८४ हेक्टर जमीन ही बुडीत क्षेत्रात नोंदविली नसल्याने, धरणात पाणी साठा ७० टक्क्यांपर्यंत गेल्यावर सदर जमिनीवरील पिके दरवर्षी पाण्याखाली जात असल्याने २०० हून अधिक शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत असल्याची बाब माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर परिस्थितीची पुनरावृत्ती टाळण्यासाठी लाभक्षेत्र विकास प्राधिकरणाच्यावतीने जायकवाडी धरणालगतच्या १८४ हेक्टर जमिनीचे कायमस्वरूपी संपादन करण्याचा प्रस्ताव सन २०२३ मध्ये वा त्यादरम्यान शासनास सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, एक वर्षाचा कालावधी उलटूनही शासनाने सदर प्रस्तावावर कोणतीही कार्यवाही केली नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुषंगाने सदर प्रस्तावास लवकरात लवकर मंजुरी देऊन शेतकऱ्यांच्या कायमस्वरूपी नुकसानास प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) हे अंशत: खरे आहे.

जायकवाडी धरण १००% भरल्यानंतर जलाशयालगतच्या शेतकऱ्यांच्या असंपादित क्षेत्रात पाणी जात असल्याची बाब सन २०१९ नंतर निदर्शनास आली आहे.
(२) होय, हे खरे आहे.

गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, छत्रपती संभाजीनगर यांनी दिनांक १९/०१/२०२४ अन्वये प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला होता व त्यावर उपस्थित मुद्दयांची पूर्तता करुन महामंडळाने दिनांक २७/०९/२०२४ रोजीच्या पत्रान्वये प्रस्ताव शासनास फेरसादर केला होता.
(३) होय, हे खरे नाही.

महामंडळाकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावावर शासनाच्या महसूल व वन विभागाचे अभिप्राय घेण्यात आले असून त्यानुसार दिनांक ०१/०७/२०२५ रोजीच्या पत्रान्वये जमीन संपादनाबाबत आवश्यक सूचना महामंडळास देण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सांगली व कोल्हापूर जिल्ह्यात अलमट्टी धरणातील अधिकच्या पाणीसाठ्यामुळे पुरस्थिती निर्माण होत असल्याबाबत

**(१५) * ४५६३ श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्रीय जल आयोगाने (Central Water Commission - CWC) अलमट्टी धरण जून महिन्यात ४७ टक्क्यापर्यंत भरण्यास परवानगी दिली असतानाही कर्नाटक शासनाच्या जलसंपदा विभागाने मान्सून पावसाचा जोर वाढण्यापूर्वीच सदरहू धरणात ५२ टक्के पाणीसाठा ठेवून केंद्रीय जल आयोगाच्या (Central Water Commission - CWC) नियमांचे उल्लंघन केले असल्याचे दिनांक १६ जून, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कर्नाटक शासनाच्या सदरहू कृतीमुळे सांगली, कोल्हापूर जिल्ह्यांतील कृष्णा, पंचगंगा, वारणा नदीकाठच्या नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले असून, अलमट्टी धरणातून पाणी सोडण्यास विलंब झाल्यास किंवा सदर धरणामध्ये पाणीसाठा अधिक ठेवल्यास व मान्सूनच्या सुरुवातीलाच जोरदार पाऊस झाल्यास पूर येण्याची शक्यता वाढते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पावसाळ्यात सांगली व कोल्हापूर जिल्ह्यात अलमट्टी धरणातील अधिकच्या पाणीसाठ्यामुळे पुन:श्च पुरस्थिति निर्माण होऊ नये, याकरीता शासनाने कोणती कार्यवाही / उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) हे खरे नाही.

केंद्रीय जल आयोगाच्या धरण जलाशय परिचालनसूचीसाठी O & M Manual मध्ये विद्युतनिर्मिती किंवा सिंचनासाठी पाणीसाठाच्या किमान पातळीचे निष्कर्ष दिले आहेत. परंतु त्या पातळीपेक्षा जास्त पाणीसाठा त्या तारखेस करु नये असे नमूद नाही.

अपर मुख्य सचिव (जलसंपदा) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २९/०५/२०२५ रोजी संपन्न झालेल्या आंतरराज्य बैठकीमध्ये अलमट्टी धरणाची पाणीपातळी १५ ऑगस्ट अखेरपर्यंत ५१७.०० मी. ते ५१७.५० मी. पर्यंत मर्यादीत ठेवावी, असा सर्व संबंधितांच्या सहमतीने निर्णय घेतला आहे. दिनांक ११/०६/२०२५ पासून अलमट्टी धरणामधून विसर्ग सुरु करण्यात आला असून अलमट्टी धरणाची पाणीपातळी ५१७.०० च्या जवळ राखली आहे.

(२) अलमट्टी धरणातील साठा वाढत असल्याने सांगली, कोल्हापूर जिल्ह्यातील कृष्णा, पंचगंगा, वारणा नदीकाठच्या नागरिकांत सद्य:स्थितीत चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे, अशा आशयाच्या बातम्या वर्तमानपत्रामधून प्रसिध्द झालेल्या आहेत.

सांगली, कोल्हापूर व सातारा जिल्ह्यातील धरणातील विसर्ग व अतिपर्जन्यमानामुळे नदीतील पाणी पातळी वाढण्यास सुरुवात झाल्यास सदरचे पाणी हे अलमट्टी धरणामध्ये पोहचण्याच्या अगोदर अलमट्टी धरणातून आवश्यक तो पाणी विसर्ग करुन अतिरिक्त पाणी धरणामध्ये सामावून घेणे एवढी जागा उपलब्ध (Well Cushion to be maintained) करण्याच्या अनुषंगाने अलमट्टी धरणाचे परिचालन करण्यात येत आहे.

(३) महाराष्ट्र व कर्नाटक राज्यातील संबंधित अधिकाऱ्यांसमवेत विविध स्तरावर वेळोवेळी बैठका घेण्यात आलेल्या आहेत. तसेच पावसाळा कालावधीसाठी वर्ग-१ दर्जाच्या आठ अधिकाऱ्यांची अलमट्टी धरण व हिप्परगी बॅरेजवर पूरसमन्वय अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे. जलद समन्वयासाठी दोन्ही राज्यातील संबंधित जलसंपदा विभागाचे वरिष्ठ अधिकारी व संबंधित जिल्हाधिकारी यांच्यामध्ये समन्वयाकरीता "Interstate Co-ordination" व्हॉटसॲप ग्रुप तयार करून दररोज आवश्यक समन्वय साधण्यात येत आहे.

महापूर परिस्थितीवर कायमस्वरुपी उपाययोजना करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र शासनाने जागतिक बँकेच्या अर्थसहाय्यातून महाराष्ट्र प्रतिसादक्षम विकास कार्यक्रम (MRDP) हाती घेतलेला आहे व त्याअनुषंगाने कार्यवाही प्रगती पथावर आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## प्राथमिक शिक्षकांसाठी 'ब्रिज कोर्स' अनिवार्य करण्याच्या निर्णयाबाबत

**(१६) * ४४८३ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बी.एड. ही पात्रता असलेल्या प्राथमिक शाळांतील शिक्षकांना ब्रिज कोर्स अनिवार्य करण्यात आला असून, शालेय शिक्षण विभागाकडून माहे एप्रिल, २०२५ मध्ये यासंदर्भात निर्णय घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निर्णयामुळे हजारो शिक्षकांवर आगामी वर्षभरात ब्रिज कोर्स पूर्ण करणे अनिवार्य झाले असून, कोर्स पूर्ण न केल्यास नोकरी धोक्यात येण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली असून शिक्षक संघटनांनी या निर्णयाला विरोध दर्शविला असून, कोर्ससाठी आवश्यक सुविधा व अडचणी लक्षात न घेतल्याचा आरोप त्यांनी केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शिक्षणाच्या गुणवत्तावाढीच्या दृष्टीने ब्रिज कोर्स उपयुक्त असला तरी त्याची अंमलबजावणी करताना शिक्षकांचा सहभाग, वेळ व ऑनलाईन स्वरूपातील अडचणींचा विचार करण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या निर्णयासंदर्भात शासनाने शिक्षक संघटनांशी चर्चा केली आहे काय व यासंदर्भात पुढे कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदेच्या दिनांक २८/०६/२०१८ च्या अधिसूचनेन्वये प्राथमिक शिक्षक पदावर बी.एड अर्हता धारण केलेल्या उमेदवारांना ते ६ महिन्याच्या कालावधीत ब्रिज कोर्स पूर्ण करण्याच्या अटीवर नियुक्त करण्याची तरतूद करण्यात आली होती. मा.सर्वोच्च न्यायालयाने ही तरतूद रद्द केली आहे. तथापि, या तरतूदीनुसार नियुक्त झालेल्या शिक्षकांच्या सेवेस संरक्षण देण्यासाठी राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदेने दिनांक ०७/०४/२०२५ रोजी ब्रिज कोर्सची तरतूद केली आहे.

(२) दिनांक २८/०६/२०१८ च्या अधिसूचनेन्वये राज्यात बीएड अर्हताधारक उमेदवारांच्या प्राथमिक शिक्षक पदावर नियुक्त्या करण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे ब्रिजकोर्स अनिवार्य करणे व त्यास विरोध करणे या बाबी गैरलागू ठरतात.
(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ.विलास आठवले**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.